**माहे नोव्हेंबर २०२१ महाचा मासिक अहवाल**

**मासिक अहवालामध्ये खालील घटकांनी चांगली कामगिरी केलेली आहे.**

| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| १ | सिंधुदूर्ग | रॅम्बो | १) पोना/४४५ ए.जी.वेंगुर्लेकर<br>२) पोना/५६३ एन.व्ही.चव्हाण | सावंतवाडी पो.स्टे. जि.सिंधुदूर्ग गु.र.नं. ३००/२०२१ भा.द.वि. कलम ३०२ हा गुन्हा दि.३१/१०/२०२१ रोजी १३:०२ वाजता दाखल असून घटनास्थळावरील गोणपटावर पडलेल्या संशयीताच्या पायाच्या ठसाच्या वास श्वान रॅम्बो यास दिला असता श्वान घरामध्ये फिरून घराच्या पाठीमागील शौचालयाच्या दिशेने गेला व परत मागे फिरत रस्त्यावर आला त्या ठिकाणापसून पुढे जात शिवाजी महाराज पुतळा मार्ग माठेवाडा मधुन पुन्हा शिवाजी महाराज पुतळयाजवळ येत माठेवाडी ते सोनारगल्ली असा गोल वळसा घालुन पुन्हा घटनास्थळापासून काही अंतरावर थांबला. तपासी अधिकारी यांनी श्वानाने दाखविलेल्या मार्गाने पुढील तपास केला असता घटनास्थळापासुन श्वान थांबलेल्या बाजुला संशयीत आरोपी कुशल टंगसाळे चे घर असल्याचे तपासामध्ये निष्पन्न झालेले असून त्याने गुन्हा कुबल केलेला आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| २ | लोहमार्ग मुंबई | मोती डॉबरमॅन | १) पोहवा/३०४१ पाटील<br>२) पोशि/९०२ घोडके | वाशी रे. पो.स्टे. जि.लोहमार्ग मुंबई गु.र.नं. १६०/२०२१ भा.द.वि. ३०२, ३९७ सह मपोका ३७(१) हा गुन्हा दि.२०/११/२०२१ रोजी दाखल असून घटनास्थळावरील मयत इसमाजवळ पडलेल्या रक्ताच्या डागाचा वास श्वान मोती यास दिला असता श्वान मोती प्रथम येणा-या पादचारी पुलावर चढून पुढे वास घेत घेत आरोपी पळालेला मार्ग दाखविला त्या अनुशंगाने सीसीटीव्ही फुटेज तपासून पाहीले असता आरोपी घटनास्थळावरून पसार झाल्याचे निष्पन्न झाले श्वान मोती याने दाखविलेल्या मार्गदर्शनावरून आरोपीस लवकरात लवकर अटक करण्यात यश आले. |




| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ३ | बुलढाणा | राणी | १) पोहवा/७३५ गजेंद्रसींग रजपुत<br>२) पोकाँ/२४१९ बबन जाधव | शेगाव (शहर) पो. स्टे. गु. र. नं. ७१६ / २०२१ भा. द. वि. कलम ३०२ हा गुन्हा दि. २९/११/२०२१ रोजी दाखल असून घटनास्थळावरील दगडाचा वास श्वान राणी हीस दिला असता ती घटनास्थळावरून मार्ग काढीत अंदाजे २५ मीटर अंतरापर्यंत जावुन अमीत ऑनलाईन सर्वीस सेंटर ला लागुन असलेल्या मोकळया जागे मध्ये उभा असलेल्या इसमाच्या अंगावर श्वान राणी ही झेप घेवुन भुंकली वरून सदर इसमास ताब्यात घेवुन चौकशी केली असता सदर इसमाने गुन्हा केल्याचे कबुल केले. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ४ | पुणे शहर | सिम्बा | १)पोहवा/३८ एस.एस.बुधावले<br>२) पोकाँ/१०७५३ बी.बी.ठाकुर | दत्तवाडी पो. स्टे. गु.र.नं. २४०/२०२१ भा.द.वि. कलम ३०२, ३२३, ५०४, ५०६, ३४ हा गुन्हा दि. १९/१०/२०२१ रोजी दाखल असून सदर गुन्हयात घटनास्थळावरून जप्त करण्यात आलेला कापडी मास्क दाखल गुन्हयातील अटक आरोपी व विधीसंघर्षीत बालक यांचेपैकी कोणाचा आहे याबाबत श्वान सिम्बा याचे मार्फत ओळखपरेड घेतली असता साध्या वेषातील १२ इसमांना एका रांगेत उभे करून घटनास्थळावरून जप्त केलेल्या कापडी मास्कचा वास श्वान सिम्बा यास दिला असता श्वानाने यातील विधीसंघर्षग्रस्त बालक नामे चैतन्य दत्तात्रय बनसोडे, वय १७ वर्षे, १० महिने रा.आंबीलओढा कॉलनी, चाळ नं.५, सानेगुरूजी नगर, पुणे यास ओळखून दाखल गुन्हयाचे तपासामध्ये महत्वपुर्ण कामगिरी बजावली आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ५ | परभणी | जॉनी | १) पोहवा/३६७ एम.ड .बुधवारे<br>२) रिक्त | बामणी पो. स्टे. जि. परभणी गु. र. नं. १२३ / २०२१ भा. द. वि. कलम ४५७, ३८० हा गुन्हा दि. २५/११/२०२१ रोजी १७:४९ वाजता दाखल असून घटनास्थळावरील आरोपीने हाताळलेला कॅश काउंटर, पैसे ठेवलेला ॲल्युमिनीअम चा डब्बा याचा वास श्वान जॉनी यास दिला असता श्वान जॉनी हा भुसार मालाचे दुकानात फिरून घराचे आत जावुन सर्व घरात फिरून बाहेर येवुन समोर उभे असलेल्या एका व्यक्तीच्या अंगावर जावुन घुटमळून भुंकत होता. सदर व्यक्ती नामे अशोक सखाराम ढोणे रा. दहेगाव, ता. जिंतुर, याची चौकशी केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले आहे. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ६ | गोंदीया | एंजल | १) पोना/१४९८ मनोज मेंढे<br>२) पोना/१० पंकज चंद्रीकापुरे | सालकेसा पो.स्टे. जि.गोंदीया गु.र.नं. २६१/२०२१ भा.द.वि.कलम ३०७, १२० (ब), भारतीया स्फोटक कायदा कलम १३,१८,२०,२३ हा गुन्हा दि.७/११/२०२१ रोजी दाखल असून सालकेसा पो.स्टे. हददतील बेवरतोला जंगल भागाची तपासणी करत असताना डीएसएमएस चा बीप आवाज आल्यामुळे श्वान एंजल हीस बोलावुन तील गो स्मेल फईंड अशी कमांड दिला असता श्वान एंजल हीने सदर ठिकाणी जावुन बसुन व भुंकून सदर ठिकाणी स्फोटके असल्याचा इशारा दिला. सदर ठिकाणी खालीलप्रमाणे स्फोटक पदार्थ मिळून आले.<br>१) ०७ नग जीलेटीन कांडया - केव्हीक्स पावडर - ९० २) ०५ नग ७.६२ एम.एम. राउंड ३) ११ नग इलेक्ट्रीक डेटॉनेटर ४) ०१ नग सुपर पावडर जेलेटीन कांडया ५) ८० फुट हिरव्या / लाल रंगाची फ्लेग्झ ीबल वायर<br>६) ०६ व्ही. ४५ ए. एच. बॅटरी ७) ०३ नग नॉन इलेक्ट्रीक डेटॉनेटर ८) ०२ नग इलेक्ट्रीक कीट (पीसीबी) ९) अंदाजे २० लीटर क्षमतेची स्टीलची टाकी. १०) ०१ नग चाकू प्लॅस्टीकची मुठ असलेला ११) ०१ नग चाकू लाकडी मुठ असलेला १२) ०२ नग गावठी काडतुस १३) ०३ नग देशी कटटा मॅगझीनसह १४) ०५ नग kfo1 A7 मार्क राउंड १५) ०३ नग OFVA709 मार्क राउंड १६) ०२ नग OFVA710 मार्क राउंड १७) ०१ नग OFVA7 8 मार्क राउंड १८) ०१ नग निळया रंगाचे कापड १९) ०१ नग प्लॅस्टीकचा मेडीसीन बॉक्स २०) पवळया रंगाच्या कॅरीबॅग मध्ये अंदाजे ७०० ग्रॅम हिरव्या रंगाची उग्र वासाची पावडर २१) सफेद रंगाच्या कॅरीबॅग मध्ये अंदाजे ७०० ग्रॅम राखाडी रंगाची उग्र वासाची पावडर<br>या प्रमाणे स्फोटक पदार्थ मिळून आले. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ७ | गोंदीया | टॉम | १) पोना/६२ दिपक सांदेल<br>२) पोना/९८ जावेद सुभेदार | सालकेसा पो.स्टे. जि.गोंदीया गु.र.नं. २६१/२०२१ भा.द.वि.कलम ३०७, १२० (ब), भारतीया स्फोटक कायदा कलम १३,१८,२०,२३ हा गुन्हा दि.७/११/२०२१ रोजी दाखल असून सालकेसा पो.स्टे. हददतील बेवरतोला जंगल भागाची तपासणी करत असताना डीएसएमएस चा बीप आवाज आल्यामुळे श्वान टॉम यास बोलावुन त्याला गो स्मेल फईंड अशी कमांड दिला असता श्वान टॉम याने सदर ठिकाणी जावुन बसुन व भुंकून सदर ठिकाणी स्फोटके असल्याचा इशारा दिला. सदर ठिकाणी खालीलप्रमाणे स्फोटक पदार्थ मिळून आले.<br>१) ०७ नग जीलेटीन कांडया - केव्हीक्स पावडर - ९० २) ०५ नग ७.६२ एम.एम. राउंड ३) ११ नग इलेक्ट्रीक डेटॉनेटर ४) ०१ नग सुपर पावडर जेलेटीन कांडया ५) ८० फुट हिरव्या / लाल रंगाची फ्लेग्झीबल वायर<br>६) ०६ व्ही. ४५ ए. एच. बॅटरी ७) ०३ नग नॉन इलेक्ट्रीक डेटॉनेटर ८) ०२ नग इलेक्ट्रीक कीट (पीसीबी) ९) अंदाजे २० लीटर क्षमतेची स्टीलची टाकी. १०) ०१ नग चाकू प्लॅस्टीकची मुठ असलेला ११) ०१ नग चाकू लाकडी मुठ असलेला १२) ०२ नग गावठी काडतुस १३) ०३ नग देशी कटटा मॅगझीनसह १४) ०५ नग kfo1 A7 मार्क राउंड १५) ०३ नग OFVA709 मार्क राउंड १६) ०२ नग OFVA710 मार्क राउंड १७) ०१ नग OFVA7 8 मार्क राउंड १८) ०१ नग निळया रंगाचे कापड १९) ०१ नग प्लॅस्टीकचा मेडीसीन बॉक्स २०) पवळया रंगाच्या कॅरीबॅग मध्ये अंदाजे ७०० ग्रॅम हिरव्या रंगाची उग्र वासाची पावडर २१) सफेद रंगाच्या कॅरीबॅग मध्ये अंदाजे ७०० ग्रॅम राखाडी रंगाची उग्र वासाची पावडर<br>या प्रमाणे स्फोटक पदार्थ मिळून आले. |



| अ क्र | घटकाचे नाव | श्वानाचे नाव / जात | हस्तकांची नावे | केलेली कामगिरीचा सारांश |
|---|---|---|---|---|
| ८ | रत्नागिरी | व्हीक्टर | १) पोहवा/१२६३ एस.एस.भोळे<br>२) पोना/१२४७ एन.एच.पाचवे | रत्नागिरी शहर पो. स्टे. गु. र. नं. ५३६ / २०२१ एनडीपीएस ॲक्ट १९८५ चे कलम ८ (सी) २० (ब) (II) हा गुन्हा दि. १९/११/२०२१ रोजी दाखल असून घटनास्थळावरील पोलीस निरीक्षकांचे आदेशावरून मुस्लीम धर्माचा वेश परिधान केलेल्या संशयीत इसमाच्या हातातील निळया रंगाच्या पिशवीचा वास श्वान व्हिक्टर यास दिला असता श्वान व्हिक्टर आक्रामक होवुन पिशवीकडे पाहून भुंकला त्यानंतर पुन्हा पोलीस निरीक्षकांचे आदेशावरून निळया रंगाचे दुचाकीच्या डीग्गीचा वास श्वान व्हीक्टर यास दिला असता श्वान आक्रामक होवुन डीग्गीकडे पाहून भुकून अंमली पदार्थ असल्याचा इशारा दिला. अशा प्रकारे श्वान व्हिक्टर याने केलेल्या मार्गदर्शनावरून संशयीताकडे अंमलीपदार्थ असल्याची खात्री होवुन संशयीत इसमाकडून ६६७ ग्रॅम वजनाचे अंमली पदार्थ (गांजा) हस्तगत करण्यात आला. |



**अशा प्रकारे माहे नोव्हेंबर २०२१ मध्ये खून - ४, घरफोडी - १, भारतीय स्फोटक कायदा - २, एनडीपीएस ॲक्ट - १ असे एकुण ८ गुन्हे श्वान पथक / बीडीडीएस पथकामार्फत उघडकीस आलेले आहेत.**